श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## वेद स्तुति(10.87) मराठी

लय अंत जब निकट था आया,श्रुति ने नारायण को जगाया,
वंदन करते भक्त सनंदन, जो था वेद स्तुति कहलाया।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**

**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

अन्तर्यामी नारायण स्वरूप भगवान् श्रीकृष्ण, (उनके नित्य सखा) नरस्वरूप नरश्रेष्ठ अर्जुन, (उनकी लीला प्रकट करनेवाली) भगवती सरस्वती और (उन लीलाओं का संकलन करनेवाले) महर्षि वेदव्यास को नमस्कार करके जय के साधन वेद-पुराणों का पाठ करना चाहिये।

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**

**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

जिन भगवान के नामों का संकीर्तन सारे पापों को सर्वथा नष्ट कर देता है और जिन भगवान के चरणों में आत्मसमर्पण, उनके चरणों में प्रणति सर्वदा के लिए सब प्रकार के दुःखों को शांत कर देती है, उन्हीं परम -तत्वस्वरूप श्रीहरि को मैं नमस्कार करता हूं।

### श्रीमद्भागवतमहापुराणम्

### दशमः स्कंधः

### अथ सप्ताशीतितमोऽध्यायः

### परीक्षिदुवाच

**ब्रह्मन् ब्रह्मण्यनिर्देश्ये, निर्गुणे गुणवृत्तयः ।**

**कथं(ञ्) चरन्ति श्रुतयः(स्), साक्षात् सदसतः(फ्) परे ॥ 1॥**

ब्रह्मण्य+ निर्देश्ये

परीक्षिताने विचारले-भगव न !ब्रह्म हे कार्य आणि कारणाच्या सर्वथैव पलीकडचे आहे .सत्व ,रज आणि तमा हे तिन्ही गुण त्यात नाही तच .वाणीने किंवा मनाने सुद्धा ते सांगता येत नाही.दुसऱ्या बाजूला सर्व श्रुतींचा विषय तर तीन गुण हाच आहे.अशा स्थितीत श्रुती निर्गुण ब्रह्माचे प्रतिपादन कसे काय करतात ?

## श्रीशुक उवाच

***बुद्धीन्द्रियमनः(फ्)प्राणान्, जनानामसृजत् प्रभुः ।**

**मात्रार्थं(ञ्) च भवार्थं(ञ्) च, आत्मनेऽ*कल्पनाय च ॥ 2॥**

बुद्धीन्+ द्रियमनः(फ्)+ प्राणान्, जनाना+ मसृजत्, आत्मनेऽ+ कल्पनाय

श्री शुकम्हणतात-भगवंतांनी जीवांना अर्थ,धर्म,काम व मोक्ष यांच्या प्राप्तीसाठी त्यांच्या ठिकाणी बुद्धी,इंद्रिये ,मन आणि प्राण्यांची निर्मिती केली .

**सैषा ह्युपनिषद् ब्राह्मी, पूर्वेषां(म्) पूर्वजैर्धृता ।**

***श्रद्धया धारयेद् *यस्तां(ङ्), क्षेमं(ङ्) *गच्छेदकिं(ञ्)चनः ॥ 3॥**

पूर्वजैर् + धृता, गच्छे+ दकिं(ञ्)चनः

ब्रह्माचे प्रतिपादन करणाऱ्या उपनिषदांचे हेच ज्ञान पूर्वजांचे सुद्धा पूर्वज असलेल्या सनकादिक ऋषींनी स्वीकारले.जो कोणी श्रद्धापूर्वक यांचे श्रवण म्हणून करतो ,तो सर्व उपाधींपासून मुक्त होऊन परम कल्याण स्वरूप परमात्म्याला प्राप्त होतो .

***अत्र ते वर्ण*यिष्यामि, गाथां(न्) नारायणान्विताम् ।**

**नार*दस्य च सं(व्)वाद- मृषेर्नारायण*स्य च ॥ 4॥**

वर्ण+ यिष्यामि, नारायणान्+ विताम्, मृषेर्+ नारायणस्य

याविषयी मी तुला नारायणांशी संबंधित एक कथा ऐकवितो.ती कथा म्हणजे नारद आणि नारायण ऋषींचा संवाद होय .

**एकदा नारदो लोकान्, पर्यटन् भगवत्प्रियः ।**

**सनातनमृषिं(न्) *द्रष्टुं(यूँ), ययौ नारायणाश्रमम् ॥ 5॥**

भगवत्+ प्रियः, सनात+ नमृषिं(न्), नारायणा+ श्रमम्

भगवंतांचे भक्त नारद एकदा निरनिराळ्या लोकांमध्ये फिरत फिरत सनातन ऋषी भगवान नारायणांचे दर्शन घेण्यासाठी बद्रिकाश्रमात गेले.

**यो वै भारतवर्षेऽस्मिन्, क्षेमा*य *स्वस्तये नृणाम् ।**

**ध*र्मज्ञानशमोपेत- मा*कल्पादास्थित*स्तपः ॥ 6॥**

भारत+ वर्षेऽस्मिन्, धर्मज्ञा+ नशमोपेत, माकल्पा+ दास्थि+ तस्तपः

मनुष्य मात्राचे लौकिक कल्याण आणि त्यांना मोक्षप्राप्ती व्हावी म्हणूनभगवान नारायण या भारत वर्षामध्ये या कल्पाच्या सुरुवातीपासूनच धर्म ,ज्ञान आणि संयम धारण करून तपश्चर्या करीत आहे .

तत्रोपविष्टमृषिभिः(ख्), कलापग्रामवासिभिः ।

परीतं(म्) प्रणतोऽपृच्छ-दिदमेव कुरूद्वह ॥ 7॥

तत्रो+ पविष्ट+ मृषिभिः(ख्), कला+ पग्राम+ वासिभिः, प्रणतोऽ+ पृच्छ, कुरूद् + वह

परीक्षिता !एके दिवशी ते कलाप ग्रामवासी सिद्ध ऋषींच्या बरोबर बसले होते .त्यावेळी नारद आणि त्यांना प्रणाम करून हाच प्रश्न विचारला होता .

तस्मै ह्यवोचद् भगवा- नृषीणां(म्) शृण्वतामिदम् ।

यो ब्रह्मवादः(फ्) पूर्वेषां(ञ्), जनलोकनिवासिनाम् ॥ 8॥

शृण्वता+ मिदम्, जनलो+ कनिवा+ सिनाम्

भगवान नारायण यांनी सर्व ऋषी ऐकत असता जन लोकांमध्ये राहणाऱ्या पूर्वीच्या लोकांचा जो ब्रह्म विचार झाला होता तो नारदांना सांगितला .

श्रीभगवानुवाच

स्वायम्भुव ब्रह्मसत्रं(ञ्), जनलोकेऽभवत् पुरा ।

तत्रस्थानां(म्) मानसानां(म्), मुनीनामूर्ध्वरेतसाम् ॥ 9॥

जनलोकेऽ+ भवत्, तत्रस् + थानां(म्), मुनीना+ मूर्ध्व+ रेतसाम्

भगवान नारायण म्हणाले - नारदमुने !पूर्वी एकदा जनलोकांमध्ये राहणारे ब्रह्मदेवाचे मानसपुत्र नैष्टिक ब्रम्हचारी सनक , सनंदन ,सनातन इत्यादी ऋषींचे ब्रह्म सत्र ब्रह्म विषयक चर्चासत्र झाले .

श्वेतद्वीपं(ङ्) गतवति, त्वयि द्रष्टुं(न्) तदीश्वरम् ।

ब्रह्मवादः(स्) सुसं(वँ)वृत्तः(श्), श्रुतयो यत्र शेरते ।

तत्र हायमभूत् प्रश्नस्- त्वं(म्) मां(यँ) यमनुपृच्छसि ॥ 10॥

त्यावेळी तू माझ्या श्वेतद्वीपाधीपती अनिरुद्धांचे दर्शन घेण्यासाठी श्वेतद्वीपाकडे गेला होतास .त्यावेळी तेथे ज्या ब्रह्माच्या विषयात श्रुती मौन धारण करतात त्यासंबंधी अतिसुंदर चर्चा झाली होती .जो तू मला आता विचारलास तोच प्रश्न त्यावेळी तेथे उपस्थित केला गेला होता .

तुल्यश्रुततपः(श्)शीलास्-तुल्यस्वीयारिमध्यमाः ।

अपि चक्रुः(फ्) प्रवचन-मेकं(म्) शुश्रूषवोऽपरे ॥ 11॥

तुल्यश्रुत+ तपः(श्)+ शीलास्, तुल्यस् + वीयारि+ मध्यमाः, शुश्रू+ षवोऽपरे

सनक , सनंदन , सनातनआणि सनत्कुमारहे चारही भाऊ शास्त्रीय ज्ञान ,तपश्चर्या आणि स्वभाव याबाबतीत समान आहेत .त्यांना शत्रू मित्र आणि उदासीन एक सारखेच वाटतात .त्यांनी आपल्यापैकी स नंदन यांना वक्ता म्हणून नियुक्त केले आणि अन्य भाऊ श्रोते झाले .

## सनन्दन उवाच

**स्वसृष्टमिदमापीय, शयानं(म्) सह शक्तिभिः ।**

**तदन्ते बोधयां(ञ्)चक्रुस्-तल्लिङ्गैः(श्) श्रुतयः(फ्) परम् ॥ 12॥**

स्वसृष्ट+ मिदमा+ पीय, बोधयां(ञ्)+ चक्रुस्

**यथा शयानं(म्) सम्राजं(वँ), वन्दिनस्तत्पराक्रमैः ।**

**प्रत्यूषेऽभ्येत्य सुश्लोकैर्- बोधयन्त्यनुजीविनः ॥ 13॥**

वन्दिनस्+ तत्+ पराक्रमैः, प्रत्यू+ षेऽभ्येत्य, बोधयन्+त्यनु+ जीविनः

सनंदन म्हणाले-पहाटे झोप घेत असलेल्या सम्राटाला जागे करण्यासाठी जसे त्याचे नोकर भाट त्याच्याजवळ येतात आणि त्याचे पराक्रम व सुयशाचे गायन करून त्याला जागे करतात,त्याचप्रमाणे जेव्हा परमात्मा आपणच निर्माण केलेल्या संपूर्ण जगाला आपल्यामध्ये लीन करून आपल्या शक्ती सहितझोपी जातो,तेव्हा प्रलयाच्या शेवटी श्रुती त्यांचे प्रतिपादन करणाऱ्या वचनांनी त्यांना जागे करतात.

## श्रुतय ऊचुः

**जय जय जह्यजामजित दोषगृभीतगुणां(न्),**

**त्वमसि यदात्मना, समवरुद्धसमस्तभगः ।**

**अगजगदोकसामखिलशक्त्यवबोधक ते,**

**क्वचिदजयाऽऽत्मना च, चरतोऽनुचरेन्निगमः ॥ 14॥**

जह्य+ जामजित, दोषगृभी+ तगुणां(न्), समवरुद्ध+ समस्तभगः

अगजगदो+ कसामखिल+ शक्त्य+ वबोधक, क्वचि+ दजयाऽऽत्मना, चरतोऽ+ नुचरेन् + निगमः

श्रुती म्हणतात-ज्यांना कोणी जिंकू शकत नाही,अशा हे प्रभो !आपला जयजयकार असो !जय जयकार असो !आपण स्वभावतः चसर्व ऐश्वर्यांनी परिपूर्ण आहात .म्हणून चराचर जीवांच्या आनंदमय अशा मूळ स्वरूपाला आच्छादित करून त्यांना बंधनात अडकविणाऱ्या त्रिगुणांना धारण करणाऱ्या मायेचा नाश करा .प्राण्यांमधील ज्ञानादी सर्व शक्तींना जागृत करणारे आपणच आहात.कधी आपण मायेच्या द्वारा जगाची उत्पत्ती करून सगुनरुप धारण करता तर कधी मूळ सच्चिदानंद स्वरूपात राहता.आम्ही वेद आपले असेच वर्णन करतो. या उसको निषेध करके स्वरूप स्थिति की लीला करते हैं अथवा अपना सच्चिदानन्द स्वरूप श्रीविग्रह प्रकट करके क्रीड़ा करते हैं, तभी हम यत्किञ्चित् आपका वर्णन करने में समर्थ होती हैं।

**बृहदुपलब्धमेतदवयन्त्यवशेषतया**

**यत उदयास्तमयौ विकृतेर्मृदि वाविकृतात् ।**

**अत ऋषयो दधुस्त्वयि मनोवचनाचरितं(ङ्)**

**कथमयथा भवन्ति भुवि दत्तपदानि नृणाम् ॥ 15॥**

**बृहदुलब्धमे + तदवदयन् + त्यवशेषतया, उदयास् + तमयौ**

**विकृतेर् + मृदि, दधुस् + त्वयि, मनो+ वचना+ चरितं(ङ्)**

**ज्याप्रमाणे घटादी कार्य माती रूप कारणातून उत्पन्न होऊन त्यातच लय पावतात,त्याप्रमाणे ज्या आपल्या मध्येच कोणताही बदल न घडता ,हे सारे इंद्रियांना कळणारे विश्व ज्या आपल्यापासून उत्पन्न होऊन आपल्यातच विलीन होते आणि विश्व नसते ,तेव्हाही केवळ आपणच शिल्लक असता ,म्हणून वेदमंत्र आणि मंत्र द्दष्टेऋषी हे सर्व विश्व ब्रह्मच मानतात .तसेच मनाचे चिंतन असो किंवा नीचे उच्चारण तेही आपल्या संबंधीचआहे.असे त्यांना वाटते जसे माणसांनी कोठेही पाय ठेवला तरी तो पृथ्वीवर ठेवला असेच होते. (मग तो लाकडावर ठेव की दगडावर .कारण हे सर्व पदार्थ पृथ्वीस्वरूपच आहेत.)**

**इति तव सूरयस्त्र्यधिपतेऽखिललोकमल-**

**क्षपणकथामृताब्धिमवगाह्य तपां(म्)सि जहुः ।**

**किमुत पुनः(स्) स्वधामविधुताशयकालगुणाः(फ्),**

**परम भजन्ति ये पदमजस्रसुखानुभवम् ॥ 16॥**

**सूरयस् + त्र्यधिपतेऽ+ खिललो+ कमल, क्षपण+ कथामृताब्+ धिमवगाह्य**

**स्वधा+ मविधुता+ शयका+ लगुणाः(फ्),पदमजस्+रसुखानुभवम्**

**म्हणूनच हे त्रिगुणात्मक मायाधीपते !विवेकी लोक ,सर्व लोकांचे सर्व पाप नाहीसे करणाऱ्या तुमच्या कथामृत सागरात डुंबत राहून सर्व प्रकारचे पापताप नाहीसे करतात .तर मग हे पुरुषोत्तमा !ज्यांनी आत्मज्ञानाने अंतकरणातील विकार आणि काळामुळे उत्पन्न होणारे वारकरी दोष दूर केले आहेत आणि त्यामुळे जे अखंड आनंद स्वरूप अशा आपल्या परमपदाला प्राप्त झाले आहेत ,त्यांचे पाप ताप नाहीसे होतील,यात काय शंका !**

**द्दतय इव श्वसन्त्यसुभृतो यदि तेऽनुविधा**

**महदहमादयोऽण्डमसृजन् यदनुग्रहतः ।**

**पुरुषविधोऽन्वयोऽत्र चरमोऽन्नमयादिषु यः(स्),**

**सदसतः(फ्) परं(न्) त्वमथ यदेष्ववशेषमृतम् ॥ 17॥**

**श्वसन् + त्यसुभृतो, महदह+ मादयोऽण्ड+ मसृजन्,**

**पुरुषविधोऽन् + वयोऽत्र, चरमोऽन् + नमयादिषु, यदेष्+ ववशे+ षमृतम्**

**हे भगवन !मनुष्यप्राणी जर तुमची सेवा करतील तरच त्यांचे जीवन सफल होय.नाहीतर त्यांचे श्वासोच्छ्वास म्हणजे लोहाराच्या भात्यासारखेच होत .आपल्या अनुग्रहामुळेच महत्तत्वअहंकार इत्यादी**

जडतत्त्वांनी ब्रह्मांड रचले.अन्नमयादी पंचकोशात त्या त्या आकाराने(परंतु त्यांच्याशी लिप्त न होता )राहून आपण त्यांना चैतन्य मय केले.या पाचकोषांचा आधार असलेले ब्रह्महीआपणच आहात .किंबहुना कार्यकारणात्मक विश्वाचा ही पलीकडे असणारे व त्याच्या नाशानंतरही शिल्लक राहणारे साक्षी भूत सत्यतत्व आपणच आहात .

उदरमुपासते य ऋषिवर्त्मसु कूर्पदृशः(फ्)

परिसरप*द्धतिं(म्) हृदयमारुणयो दहरम् ।

तत उदगादन*न्त तव धाम शिरः(फ्) परमं(म्)

पुनरिह यत् समेत्य न पत*न्ति कृतान्तमुखे ॥ 18॥

उदरमु+ पासते,ऋषि+वर्त्मसु, कृतान् + तमुखे

ऋषींनी आपल्या प्राप्तीचे जे मार्ग सांगितले आहेत त्यांपैकी मणिपूर चक्रात असणाऱ्या ब्रह्माची उपासना स्थूलदृष्टीचे साधक करतात.जेथून सर्व नाड्या शरीरभर पसरल्या आहेत.त्या हृदयात धरब्रम्हाची उपासना'आरुणी' साधक करतात .हे अनंता !त्या हृदयातून' सुषुम्ना 'नावाची जी एक नाडी तुमच्या साक्षात्काराचे श्रेष्ठ स्थान असलेल्या ब्रह्मरंध्रात गेली आहे .तेथे काही साधक तुमची उपासना करतात.या साधकांना तेथे तुमचा साक्षात्कार झाल्यानंतर पुन्हा या संसारात यावे लागत नाही .

स्वकृतविचि*त्रयोनिषु विशन्निव हेतुतया

तरतमत*श्चकास्स्यनलवत् स्वकृतानुकृतिः ।

अथ वितथास्वमूष्ववितथं(न्) तव धाम समं(वँ)

विरजधियोऽन्वयन्त्यभिविप*ण्यव एकरसम् ॥ 19॥

स्वकृत+ विचित्र + योनिषु, विशन् + निव, तरतमतश् + चकास् + स्यनलवत्

वितथास् + वमूष्व + वितथं(न्), विरजधियोऽन् + वयन्+ त्यभिवि+ पण्यव

स्वतःच निर्माण केलेल्या निरनिराळ्या योनींमध्ये उपादान कारण रूपाने आपणच असून जीव रुपाने जणू प्रवेश केला आहे.अग्नि जसा लहान मोठ्या लाकडामुळे लहान मोठा वाटतो त्याप्रमाणे त्या त्या योनीत राहण्यामुळे आपण लहान मोठे भासता.म्हणूनच निर्मल अंतकरण असलेले निष्काम भक्त ,मिथ्या असणाऱ्या या सर्व योनीत सत्य,सर्वत्र समान,एक रस असे तुमचे स्वरूपच असल्याचा अनुभव घेतात .

स्वकृतपुरेष्वमीष्वबहिर*न्तरसं(वँ)वरणं(न्)

तव पुरुषं(वँ) वदन्त्यखिलश*क्तिधृतों(म्)ऽशकृतम् ।

इति नृगतिं(वँ) विवि*च्य कवयो निगमावपनं(म्)

भवत उपासतेऽङ्घ्रिमभवं(म्) भुवि वि*श्वसिताः ॥ 20॥

स्वकृतपुरेष् + वमीष्व+ बहिरन्+ तरसं(वँ) +वरणं(न्)

वदन् + त्यखिल + शक्तिधृतो(म्)ऽ+ शकृतम्, उपासतेऽङ्घ्रि+ मभवं(म्)

स्वतःच्या कर्माने निर्माण केलेल्याया शरीरात राहणारा कार्य कारण रहित असा जो जिवात्मा तो सर्व शक्ती संपन्न अशा आपलेच स्वरूप आहे .ज्ञानी लोक जीवाच्या या वास्तविक स्वरूपाचा विचार करून या भू लोकात सर्व वेदोक्तकर्मांच्या समर्पणाचे स्थान व मोक्ष स्वरूप अशा आपल्या चरणांची पूर्ण श्रद्धेने उपासना करतात.( कारण या उपासनेनेच जीवाला मी च ब्रहम आहे हा साक्षात्कार होतो.)

**दुरवगमात्मतत्त्वनिगमाय तवात्ततनोश्-**

**चरितमहामृताब्धिपरिवर्तपरि*श्रमणाः ।**

**न परिल*षन्ति केचिदपवर्गमपीश्वर ते**

**चरणसरोजहं(म्)सकुलसं(ङ्)गवि*सृष्टगृहाः ॥ 21॥**

दुरवगमात् + मतत्त्व + निगमाय, तवात्+ ततनोश्

चरितमहा+ मृताब्धि+ परिवर्त + परिश्रमणाः, केचि+ दपवर्ग+ मपीश्वर,

चरणसरो+ जहं(म्)स+ कुलसं(ङ्)ग+ विसृष्टगृहाः

हे परमेश्वरा !कळण्यास अत्यंत कठीण अशा आत्मतत्त्वाचे ज्ञान करून देण्यासाठी अवतार घेणाऱ्या आपल्या चरित्र रूप अमृताच्या महासागरात पोहून जे आपले त्रिविधताप नाहीसे करतात ,त्यांना मोक्षाशीही इच्छा नसते .इतकेच काय ,पण काहीजण तर ,आपल्या चरण कमलांचे हंस बनवून सेवा करणाऱ्या भक्तांच्या सहवासात राहण्यासाठी आपल्या घरादाराचाही त्याग करतात .

**त्वदनुपथं(ङ्) कुलायमिदमात्मसुहृत्प्रियवच्-**

**चरति तथोन्मुखे त्वयि हिते प्रिय आत्मनि च ।**

**न बत रमन्त्यहो असदुपासनयाऽऽत्महनो**

**यदनुशया भ्रमन्त्युरुभये कुशरीरभृतः ॥ 22॥**

कुला+ यमिदमात् + मसुहृत्+ प्रियवच्, असदुपा+ सनयाऽऽत् + महनो, भ्रमन्+ त्युरुभये

जर हे शरीर तुमच्या सेवेसाठी उपयोगात आणले तर तेच आपला आत्मा, हितचिंतक आणि मित्र बनते. शिवाय आपणही जीवाचे हितचिंतक, मित्र व आत्मा असल्यामुळे त्याला भेटायला नेहमी उत्सुक असता. अशी सर्व सोय असूनही जीवांचे केवढे हे दुर्दैव की, ते आपल्या उपासनेत रमत नाहीत. उलट शरीर,घरदार इत्यादी विनाशी वस्तूंत रमून स्वतःची अधोगती करून घेतात.परिणामी त्यांच्या ठिकाणीच वासना जडल्याने पशुपक्ष्यादी क्षुद्र शरीरे त्यांना प्राप्त होतात आणि या भयंकर जन्ममृत्युरूप प्रपंचातच ते भटकत राहातात.

**निभृतम*रुन्मनोऽक्षदृढयोगयुजो हृदि य*न्-**

**मुनय उपासते तदरयोऽपि ययुः(स्) स्मरणात् ।**

**स्त्रिय उरगेन्द्रभोगभुजदण्डविषक्तधियो**

**वयमपि ते समाः(स्) समदृशोऽङ्घ्रिसरोजसुधाः ॥ 23॥**

निभृ+ तमरुन्+ मनोऽक्ष+ दृढयो+ गयुजो, उरगेन्द्र+ भोगभुज+ दण्डविषक्त+ धियो,

समदृशोऽङ्घ्रि+ सरोजसुधाः

योगीजन प्राण, मन, इंद्रिये यांचा निग्रह करून दृढ योगाभ्यासाने अंत:करणात ज्या तत्त्वरूप आपली उपासना करतात, त्याच तत्त्वाला तुमचे शत्रूसुद्धा निरंतर तुमच्या स्मरणाने प्राप्त होतात. शेषनागाच्या शरीराप्रमाणे असणाऱ्या तुमच्या बाहूंवर आसक्त होणाऱ्या स्त्रिया आणि तुमची चरणकमले नित्य धारण करणाऱ्या आम्ही श्रुती समदर्शी अशा तुमच्या दृष्टीने सारख्याच.(योगाने असो, द्वेषाने असो, प्रेमाने असो की अद्वितीय भावनेने असो तुमचे स्मरणच तुमची प्राप्ती करून देणारे आहे.)

**क इह नु वेद बतावरजन्मलयोऽग्रसरं(यँ)**

**यत उदगादृषिर्यमनु देवगणा उभये ।**

**तर्हि न सन्न चासदुभयं(न्) न च कालजवः(ख्)**

**किमपि न तत्र शास्त्रमवकृष्य शयीत यदा ॥ 24॥**

बता+ वरजन्+ मलयोऽग्र+ सरं(यँ), उदगा+ दृषिर्+ यमनु, शास्त्र+ मव+ कृष्य

हे भगवन ! अनादी व अनन्त अशा ज्या आपल्यापासून प्रथम ब्रह्मदेव व त्यानंतर आध्यात्मिक व आधिदैविक देवगण उत्पन्न झाले,त्या आपल्याला या जगात ज्यांचे जन्म-मृत्यू त्याहीनंतरचे आहेत, त्यांपैकी कोण बरे जाणू शकेल ? शिवाय ज्यावेळी आपण सारे विश्व आपल्यात समाविष्ट करून झोपी जाता, त्यावेळी तर स्थूल सूक्ष्म जग, काळाचा वेग किंवा शास्त्र काहीच नसते.(तर मग तुमचे ज्ञान कोणाला कसे होणार ?)

**जनिमसतः(स्) सतो मृतिमुतात्मनि ये च भिदां(वँ)**

**विपणमृतं(म्) स्मरन्त्युपदिशन्ति त आरुपितैः ।**

**त्रिगुणमयः(फ्) पुमानिति भिदा यदबोधकृता**

**त्वयि न ततः(फ्) परत्र स भवेदवबोधरसे ॥ 25॥**

मृतिमुतात्+ मनि, स्मरन्त्यु+ पदिशन्ति, भवे+ दवबो+ धरसे

वैशेषिक पूर्वी नसलेले जग नवीन उत्पन्न झाले असे मानतात.नैयायिक एकवीस प्रकारच्या दुःखांचा नाश हाच मोक्ष मानतात.सांख्य आत्मे अनेक मानतात.मीमांसक कर्मफलालाच सत्य मानतात. श्रुतिविरोधामुळे हे सर्व भ्रमात्मक ज्ञान आहे. परमात्मा त्रिगुणात्मक आहे, ही भेदबुद्धी तुमच्या बाबतीत अज्ञानमूलक आहे.अज्ञानाच्या पलीकडे केवळ ज्ञानस्वरूप असणाऱ्या आपल्या ठिकाणी हा भेद कोठून असणार ?

सदिव मनस्त्रिवृत्त्वयि विभात्यसदामनुजात्

सदभिमृशन्त्यशेषमिदमात्मतयाऽऽत्मविदः ।

न हि विकृतिं(न्) त्यज*न्ति कनक*स्य तदात्मतया

स्वकृतम*नु*प्रविष्टमिदमात्मतयावसितम् ॥ 26॥

मनस् + त्रिवृत् + त्वयि, विभात्+ यसदा+ मनुजात्,

सदभिमृशन्+ त्यशेषमिदमात्+ मतयाऽऽत्+ मविदः

स्वकृतमनु+ प्रविष्ट+ मिदमात्+ मतया+ वसितम्

तुमच्या अधिष्ठानावर पुरुषापासून सर्व त्रिगुणात्मक जग, मनामुळे नसूनही असल्यासारखे भासते. आत्मज्ञानी मात्र हे सर्व विश्व आत्म्यापासून उत्पन्न झाल्यामुळे आत्म्याप्रमाणेच सत्य मानतात. सोन्याचा दागिनांही सोने म्हणूनच स्वीकारला जातो ना? तसेच आपल्यापासून उत्पन्न झालेले व आपण ज्यात प्रवेश केला आहे, असे हे जग आत्मज्ञानी निश्चयाने आत्मरूपच मानतात.

तव परि ये चरन्त्यखिलसत्त्वनिकेततया

त उत पदाऽऽक्रमन्त्यविगणय्य शिरो निर्ऋतेः ।

परिवयसे पशूनिव गिरा विबुधानपि तां(म्)स्-

त्वयि कृतसौहृदाः(ख्) खलु पुन*न्ति न ये विमुखाः ॥ 27॥

चरन् + त्यखिल+ सत्त्वनिके+ ततया, पदाऽऽ+ क्रमन्+ त्यविगणय्य

सर्व चराचर हे आपले निवासस्थान आहे, असे समजून जे तुमची सेवा करतात, ते जन्म-मृत्यूची पर्वा न करता मृत्यूच्या मस्तकावर पाय ठेवतात.(अर्थात मुक्त होतात) परंतु तुमच्यापासून जे दूर जातात, ते जरी विद्वान असले, तरी त्यांना तुम्ही जनावरांना बांधावे तसे वेदवाणीरूपी दाव्याने बांधून टाकता. याउलट जे तुमची भक्ती करतात, ते स्वतःला आणि इतरांनाही पवित्र करतात.(भक्तिहीन विद्वानांना केवळ शब्दज्ञान होते आणि भक्तांना साक्षात्कार होतो.)

त्वमकरणः(स्) स्वराडखिलकारकशक्तिधरस्-

तव बलि*मु*द्वह*न्ति समदन्त्यजयानिमिषाः ।

वर्षभुजोऽखिल*क्षितिपतेरिव वि*श्वसृजो

विदधति य*त्र ये त्वधिकृता भवत*श्चकिताः ॥ 28॥

स्वराड+ खिलका+ रकशक्ति+ धरस्, बलिमुद् + वहन्ति, समदन् + त्यजया+ निमिषाः

वर्षभुजोऽ+ खिलक्षिति+ पतेरिव, भवतश्+ चकिताः

हे प्रभो ! आपण इंद्रियरहित आहात, पण स्वयंप्रकाश आहात.(आपल्या ज्ञानाला इंद्रियांची जरूर नाही.) साऱ्या प्राण्यांची इंद्रिये आपल्यामुळेच कार्ये करतात. म्हणूनच मायावेष्टित ब्रह्मदेवासह सर्व देव आपली पूजा करतात आणि मनुष्यांनी दिलेले हव्यकव्यादी भक्षण करतात. ज्याप्रमाणे मांडलिक राजे प्रजेकडून कर घेऊन सम्राटाला देतात, त्याचप्रमाणे सर्व देव त्यांना ज्या ज्या कार्यासाठी नेमलेले असेल, ते ते कार्य तुमच्या भीतीने ते पार पाडतात. (हे कार्य करणे, हीच हे तुमची पूजा आहे आणि मनुष्यांनी केलेली देवांची पूजा हे त्यासाठी देवांना मिळालेले वेतन आहे.)

स्थिरचरजातयः(स्) स्युरजयोत्थनिमित्तयुजो

विहर उदीक्षया यदि परस्य विमुक्त ततः ।

न हि परमस्य कश्चिदपरो न परश्च भवेद्

वियत इवापदस्य तव शून्यतुलां(न्) दधतः ॥ 29॥

स्थिर+ चरजातयः(स्), स्युरजयोत्+ थनिमित्तयुजो

हे मायारहित प्रभो ! जेव्हा आपण मायेसह क्रीडा करू इच्छिता, तेव्हा मायेचा संग नसलेल्या तुमच्या केवळ संकल्पाने, मायेमुळे उत्पन्न होणाऱ्या सूक्ष्म शरीरांनी युक्त होऊन निरनिराळ्या चराचराचा जन्म होतो.(आपल्या संकल्पाने निर्माण झालेल्या सृष्टीत जरी विषमता असली, तरी त्याला कारण आपण नाही.)कारण आपण आकाशाप्रमाणे सर्वांशी सम असून परमदयाळू आहात. आपल्याला कोणी स्वकीय नाही की परकीय नाही. या सृष्टीच्या प्रारंभी वाणीला किंवा मनाला न कळणारे आपण शून्यवत होता.

अपरिमिता ध्रुवास्तनुभृतो यदि सर्वगतास्-

तर्हि न शास्यतेति नियमो ध्रुव नेतरथा ।

अजनि च यन्मयं(न्) तदविमुच्य नियन्तृ भवेत्

सममनुजानतां(यँ) यदमतं(म्) मतदुष्टतया ॥ 30॥

ध्रुवास्+ तनुभृतो, सम+ मनुजा+ नतां(यँ)

हे नित्य एकरस प्रभो ! जर जीव वास्तविक अनंत, नित्य आणि सर्वव्यापी असतील,तर ते आपल्या सारखेच असल्यामुळेच आपण त्यांचे नियंत्रक होऊ शकणार नाही. मात्र असे नसेल, तरच आपण त्यांचे नियंत्रण करू शकाल.उपाधीने का असेना, पण जीवरूप कार्य ज्या परमात्मरूप कारणापासून निर्माण झाले, ते कारण सर्व जीवांमध्ये असल्यामुळे परमात्माच सर्व जीवांचा नियन्ता ठरतो. जे लोक आपल्याला जाणले, असे म्हणतात, त्यांना आपण कधीच कळलेले नसता ! कारण जाणली जाणारी वस्तू प्रत्येकाच्या मतानुसार वेगळी ठरते. आणि आपण तर नित्य एकरूप आहात.

न घटत उद्भवः(फ्) प्रकृतिपूरुषयोरजयो-

रुभययुजा भवन्त्यसुभृतो जलबुद्बुदवत् ।

**त्वयि त इमे ततो विविधनामगुणैः(फ्) परमे**

**सरित इवार्णवे मधुनि लिल्युरशेषरसाः ॥ 31॥**

**प्रकृतिपू+ रुषयो+ रजयो, भवन् + त्यसुभृतो, जलबुद्+ बुदवत्,**

**विविधना+ मगुणैः(फ्), लिल्युरशे+ षरसाः**

**प्रकृती आणि पुरुष हे दोन्हीही जन्मरहित असल्यामुळे यांपैकी कोणीही एक जीवरूपाने जन्मले असे म्हणता येत नाही. (जर प्रकृती जीवरूपाने जन्मली म्हटले तर जीव अचेतन ठरेल आणि पुरुष जन्मला म्हटले, तर निर्विकार पुरुषात विकार उत्पन्न झाला,असे होईल.) म्हणून वारा हे निमित्तकारण आणि पाणी हे उपादानकारण यांपासून बुडबुडे तयार होतात, तसेच पुरुष व प्रकृती या दोहोंच्या संयोगाने जीव तयार होतात,असे म्हटले पाहिजे.त्यामुळेच हे सारे जीव अनेक प्रकारच्या नामरूपांसह परमकारण अशा तुमच्यामध्येच विलीन होतात. जशा नद्या समुद्रात किंवा जसे सर्व फुलांचे रस मधात विलीन होतात.**

**नृषु तव मायया भ्रममममीष्ववगत्य भृशं(न्)**

**त्वयि सुधियोऽभवे दधति भावमनुप्रभवम् ।**

**कथमनुवर्ततां(म्) भवभयं(न्) तव यद् भ्रुकुटिः(स्)**

**सृजति मुहुस्त्रिणेमिरभवच्छरणेषु भयम् ॥ 32॥**

**भ्रम+ ममीष्व+ वगत्य, भावमनु+ प्रभवम्, कथमनु+ वर्ततां(म्)**

**मुहुस् + त्रिणे+ मिरभवच् + छरणेषु**

**हे प्रभो ! तुमच्या मायेमुळे हे जीव जन्म-मृत्यूच्या चक्रात फिरत आहेत, हे पूर्णपणे जाणून ज्ञानी लोक संसार- निवर्तक अशा आपल्याला शरण येतात. जे आपल्याला अनुसरतात, त्यांना संसारभय कोठून असणार ? मात्र ज्यांची भृकुटी हाच तीन ऋतू असणारा काळ आहे, तो आपल्याला शरण न येणाऱ्यांना भयभीत करतो. (आपल्याला शरण आल्यास संसाराचे वा काळाचे भय उरत नाही.)**

**विजितहृषीकवायुभिरदान्तमनस्तुरगं(यँ)**

**य इह यतन्ति यन्तुमतिलोलमुपायखिदः ।**

**व्यसनशतान्विताः(स्) समवहाय गुरोश्चरणं(वँ)**

**वणिज इवाज सन्त्यकृतकर्णधरा जलधौ ॥ 33॥**

**विजितहृषी+ कवायुभिरदान्+ तमनस्+ तुरगं(यँ), यन्तु+ मतिलो+ लमुपा+ यखिदः**

**व्यसन+ शतान्विताः(स्), गुरोश्+ चरणं(वँ), सन्त्य+ कृत+ कर्णधरा**

**हे अजन्मा प्रभो ! ज्यांनी इंद्रिये व प्राण यांचा निग्रह केलेला आहे, पण जे गुरुचरणांना शरण गेले नाहीत, ते जर उच्छृंखल व अत्यंत चंचल अशा मनरूप घोड्याला ताब्यात आणण्याचा प्रयत्न करतील, तर त्याचे**

त्यांना फक्त कष्टच होतील व त्यांच्यावर शेकडो संकटे येतील. जशी नावाड्याशिवाय नाव घेऊन समुद्रप्रवास करणाऱ्या व्यापाऱ्यांची गत होते, तशी त्या साधकांची गत होते.

**स्वजनसुतात्मदारधनधामधरासुरथैस्-**

**त्वयि सति किं(न्) नृणां(म्) श्रयत आत्मनि सर्वरसे ।**

**इति सदजानतां(म्) मिथुनतो रतये चरतां(म्)**

**सुखयति को न्विह* स्वविहते स्वनिर*स्तभगे ॥ 34॥**

**स्वजन+ सुतात्मदा+ रधनधा+ मधरा+ सुरथैस्, स्वनिरस् + तभगे**

सर्व रसस्वरूप असे तुम्ही जीवांचा आत्मा असताना तुमचा आश्रय करणाऱ्या माणसाला आप्तेष्ट, पुत्र, शरीर,पत्नी,धन,घर,जमीन-जुमला,प्राण किंवा रथ इत्यादी गोष्टींची काय जरूर आहे? याउलट 'आत्मसुख हेच सत्यसुख आहे,'हे न जाणणाऱ्या आणि सुखासाठी मैथुनादी गोष्टींचा अवलंब करणाऱ्या अज्ञानी लोकांना मुळातच नश्वर व निःसार अशा या संसारातील कोणती वस्तू आनंद देऊ शकणार आहे ?

**भुवि पुरुपु*ण्यतीर्थसदनान्यृषयो विमदास्-**

**त उत भव*त्पदाम्बुजहृदोऽघभिदङ्घ्रिजलाः ।**

**दधति सकृ*न्मनस्त्वयि य आत्मनि नि*त्यसुखे**

**न पुनरुपासते पुरुषसारहरावसथान् ॥ 35॥**

**पुरुपुण्य+ तीर्थसदनान् + यृषयो, भवत् + पदाम्बुज+ हृदोऽ+ घभिदङ् + घ्रिजलाः**

**सकृन्+ मनस्+ त्वयि, पुरुषसा+ रहरा+ वसथान्**

या पृथ्वीतलावर हृदयात आपल्या चरणकमलांग धारण करणारे व त्यामुळेच ज्यांचे चरणतीर्थ पाप नाहीसे करते,असे ऋषीसुद्धा अहंकाररहित होऊन अतिशय पुण्यमय अशा तीर्थांचा व आश्रमांचा आश्रय करतात. माणसांनी नित्य आनंदमय आत्मस्वरूप अशा आपल्या ठिकाणी एकवेळ जरी मन लावले तरी ते पुन्हा माणसाचे विवेक वैराग्यादी गुण नाहीसे करणाऱ्या घराकडे फिरकत नाहीत.

**सत इदमु*त्थितं(म्) सदिति चेन्ननु तर्कहतं(वँ)**

**व्यभिचरति* क्व च* क्व च मृषा न तथोभययुक् ।**

**व्यवहृतये विक*ल्प इषितोऽन्धपर*म्परया**

**भ्रमयति भारती त उरुवृत्तिभिरु*क्थजडान् ॥ 36॥**

**इषितोऽन् + धपरम् + परया, उरुवृत्ति+ भिरुक् + थजडान्**

कारण व कार्य एकरूप असतात, या नियमाप्रमाणे हे विश्व सत्तत्त्वापासून उत्पन्न झाल्यामुळे सत् आहे,

असे म्हणावे, तर ते तर्कशुद्ध ठरत नाही. (कारण जग हे असत्य आहे.) कारण व कार्य एकरूप असतात, हा नियमही निरपवाद नाही. जसा पिता व पुत्र यांच्यात कार्यकारणभाव असला, तरी एकरूपता नसते. काही ठिकाणी तर कार्य काल्पनिक असते. जसे दोरी हे साप भासण्याचे कारण असले, तरी त्या ठिकाणचे कार्य साप हा काल्पनिक असतो. या ठिकाणी सर्पाभासाचे कारण केवळ दोरी नसून दोरीचे अज्ञान हेही एक कारण आहे. याचप्रमाणे सत्तत्त्वाच्या ठिकाणी अज्ञानाने भासणारे हे जग असल्यामुळे ते सापाप्रमाणे मिथ्या किंवा काल्पनिक आहे. व्यवहाराच्या सिद्धीसाठी जग सत्य मानले, तरी त्यामुळे काही बिघडत नाही. (त्यामुळे ब्रह्माद्वैताच्या पारिमार्थिकतेला बाध येत नाही. कारण जगाची सत्ता ही व्यावहारिक सत्ता आहे.) आणि ही अन्धपरंपरा अनादी काळापासून चालू आहे. अशा स्थितीत कर्मफल नित्य मानणारी तुमची वेदवाणी कर्मावर अत्यंत श्रद्धा ठेवणाऱ्या मंदमतींना भ्रमित करते. (वास्तविक वेद कर्मफलाला नित्य मानीत नाहीत, तर ते आत्मज्ञानाला पात्र नसलेल्यांना कर्माकडे प्रवृत्त करण्यासाठी कर्माची लक्षणावृत्तीने प्रशंसा करतात, एवढेच.)

न यदिदम*ग्र आस न भवि*ष्यदतो निधना-

दनुमितम*न्तरा त्वयि विभाति मृषैकरसे ।

अत उपमीयते द्रविणजातिविक*ल्पपथैर्-

वितथमनोविलासमृतमि*त्यवयन्त्यबुधाः ॥ 37॥

द्रविणजा+ तिविकल्प+ पथैर्, वितथमनो+ विलास+ मृतमित्य+ वयन्त्यबुधाः

हे विश्व उत्पत्तीच्या पूर्वी नव्हते आणि प्रलयानंतरही असणार नाही. त्यावरून हे सिद्ध होते की, मध्येसुद्धा नित्य अशा तुमच्या अधिष्ठानावरच ते मिथ्या भासते. म्हणूनच माती इत्यादी कारणांपासून उत्पन्न झालेल्या घडा इत्यादी कार्यद्रव्यांची जगाला उपमा दिली जाते. (घडा म्हणजे वास्तविक विशिष्ट आकार व नाव असलेली मातीच. तसेच विविध नावारूपांनी नटलेले विश्व म्हणजे एकमेवाद्वितीय | परब्रह्मच) पण अज्ञानी लोक मात्र मनाच्या या खोट्या कल्पनारूप जगाला सत्य मानतात.

स यदजया त्वजामनुशयीत गुणां(म्)श्च जुषन्

भजति सरूपतां(न्) तदनु मृ*त्युमपेतभगः ।

त्वमुत जहासि तामहिरिव* त्वचमात्तभगो

महसि महीयसेऽष्टगुणितेऽपरिमेयभगः ॥ 38॥

त्वजा+ मनुशयीत, मृत्युमपे+ तभगः, त्वचमात् + तभगो ,मही+ यसेऽष्ट+ गुणितेऽ+ परिमे+ यभगः

तोच अज्ञानी जीव जेव्हा मायेमुळे अविद्येला कवटाळतो आणि त्यामुळे देहेन्द्रियांना आपलेच खरे रूप समजतो, तेव्हा त्याचे मुळचे नित्य-शुद्ध-बुद्धादी स्वरूप लोप पावते व तो जन्म-मृत्यूच्या चक्रात फिरत राहातो. परंतु हे प्रभो ! आपण मात्र सापाने कात टाकावी, तसा मायेचा त्याग करता, म्हणून आपले ऐश्वर्य नित्य आपल्याबरोबरच राहाते.त्यामुळे अष्टसिद्धियुक्त अनंत ऐश्वर्यात आपण विराजमान राहाता.

यदि न समुद्धरन्ति यतयो हृदि कामजटा

दुरधिगमोऽसतां(म्) हृदि गतोऽस्मृतकण्ठमणिः ।

असुतृपयोगिनामुभयतोऽप्यसुखं(म्) भगवन्-

ननपगतान्तकादनधिरूढपदाद् भवतः ॥ 39॥

समुद् + धरन्ति, दुरधिगमोऽ+ सतां(म्), गतोऽस् + मृतकण्ठमणिः

असुतृपयो+ गिना+ मुभयतोऽप् + यसुखं(म्), ननपगतान् + तकादनधिरू+ ढपदाद्

हे भगवन! अज्ञानी लोकांनी योगी होऊनसुद्धा जर आपल्या हृदयांतील विषयवासनांना उखडून फेकून दिले नाही, तर आपण त्यांच्या हृदयांत असूनसुद्धा, एखाद्याने आपल्याच गळ्यातील मणी आठवण नसल्याने इकडे तिकडे धुंडाळावा, त्याप्रमाणे ते आपल्याला शोधत राहातात, पण आपण त्यांना सापडत नाही. जे लोक आपल्या इंद्रियांना तृप्त करण्यातच मग्न असतात, त्यांना इहलोकी उपभोगासाठी द्रव्यार्जन इत्यादींसाठी कष्ट करावे लागतात. शिवाय जन्म- मृत्यूपासून त्यांची सुटका झालेली नसते. आणि आपले स्वरूप समजून न घेतल्यामुळे स्वतःच्या वर्णाश्रमधर्माचे उल्लंघन त्यांच्याकडून होते. म्हणून परलोकात गेल्यावर नरकाची भीतीही राहाते.

त्वदवगमी न वेत्ति भवदुत्थशुभाशुभयोर्-

गुणविगुणान्वयां(म्)स्तर्हि देहभृतां(ञ्) च गिरः ।

अनुयुगमन्वहं(म्) सगुण गीतपरम्परया

श्रवणभृतो यतस्त्वमपवर्गगतिर्मनुजैः ॥ 40॥

भवदुत् + थशुभा+ शुभयोर्, गुणविगुणान् + वयां(म्)स्तर्हि, यतस्+ त्वम+ पवर्ग+ गतिर्मनुजैः

हे भगवन! आपले वास्तविक स्वरूप जाणणाऱ्या मनुष्याला आपण दिलेल्या पुण्य-पापाच्या सुख-दुःखरूप फळाची जाणीव होत नाही. त्यावेळी विधि-निषेध प्रतिपादन करणारे शास्त्रसुद्धा त्याला लागू होत नाही. शिवाय ज्या माणसांनी दररोज आपल्या प्रत्येक युगामध्ये केलेल्या उपदेशांचे संतांकडून श्रवण करून त्याद्वारा तुम्हांला स्वतःच्या हृदयात प्रतिष्ठित केले,त्यांनाही आपणच मोक्ष प्राप्त करून देता.

द्युपतय एव ते न ययुरन्तमनन्ततया

त्वमपि यदन्तराण्डनिचया ननु सावरणाः ।

ख इव रजां(म्)सि वान्ति वयसा सह यच्छ्रुतयस्-

त्वयि हि फलन्त्यतन्निरसनेन भवन्निधनाः ॥ 41॥

ययुरन्त+ मनन्त+ तया, यदन्त+ राण्ड+ निचया, यच्छ्रु+ तयस्, फलन् + त्यतन्+ निरसनेन

हे भगवन!स्वर्ग इत्यादी लोकांचे अधिपतीच आपला थांग लावू शकले नाहीत असे नाही,तर आपल्यालासुद्धा तो लागला नाही. कारण जर आपल्याला शेवटच नाही, तर तो कोण कसा जाणू शकेल ? प्रभो! जसे आकाशात हवेमुळे धुळीचे अनंत कण उडत असतात, त्याचप्रमाणे आपल्यामध्ये कालगतीनुसार उत्तरोत्तर दसपट सात आवरणांसहित असंख्य ब्रह्मांडे एकाच वेळी फिरत असतात. आम्ही श्रुतीसुद्धा तुमच्या स्वरूपाचे तुमच्या व्यतिरिक्त वस्तूंचा (हे नव्हे,ते नव्हे, असा) निषेध करीत करीत शेवटी तुमच्यापर्यंत येऊन थांबतो.

## श्रीभगवानुवाच

**इ*त्येतद् ब्रह्मणः(फ्) पु*त्रा, आश्रु*त्यात्मानुशासनम् ।**

**सन*न्दनमथानर्चुः(स्), सि*द्धा ज्ञात्वाऽऽत्मनो गतिम् ॥ 42॥**

आश्रुत्यात्+ मानुशा+ सनम्, सनन्द+ नमथा+ नर्चुः(स्)

भगवान नारायण म्हणाले- अशा प्रकारे सनकादी ऋषींनी आत्मा आणि ब्रह्म यांचे ऐक्य सांगणारा उपदेश ऐकून आत्मस्वरूपाला जाणले आणि स्वतः ते नित्य सिद्ध असूनही या उपदेशाने कृतकृत्य होऊन त्यांनी सनंदनांची पूजा केली.

**इ*त्यशेषसमाम्नाय-पुराणोपनिष*द्रसः ।**

**समु*द्धृतः(फ्) पूर्वजातैर्- व्योमयानैर्महात्मभिः ॥ 43॥**

इत्यशे+ षसमाम् + नाय, पुराणो+ पनिषद्रसः, व्योमया+ नैर् + महात्मभिः

अशा प्रकारे सर्वांचे पूर्वज असणाऱ्या त्या आकाशगामी महात्म्यांनी सर्व वेद, पुराणे आणि उपनिषदांचे सार काढले आहे.

**त्वं(ञ्) चैतद्ब्रह्मदाया*द, श्र*द्धयाऽऽत्मानुशासनम् ।**

**धारयं(म्)श्चर गां(ङ्) कामं(ङ्), कामानां(म्) भर्जनं(न्) नृणाम् ॥ 44॥**

चैतद् + ब्रह्मदा+ याद, श्रद्धयाऽऽत् + मानुशा+ सनम्

हे ब्रह्मदेवांच्या मानसपुत्रा ! तूसुद्धा श्रद्धायुक्त अंतःकरणाने ही ब्रह्मविद्या धारण करून स्वच्छंदपणे पृथ्वीतलावर विहार कर. ही विद्या माणसांच्या सर्व वासना भस्म करणारी आहे.

## श्रीशुक उवाच

**एवं(म्) स ऋषिणाऽऽदि*ष्टं(ङ्), गृहीत्वा श्र*द्धयाऽऽत्मवान् ।**

**पूर्णः(श्) श्रुतधरो राजन्- नाह वी*रव्रतो मुनिः ॥ 45॥**

ऋषिणाऽऽ+ दिष्टं(ङ्), श्रद्धयाऽऽत्+ मवान्

श्रीशुक म्हणतात- परीक्षिता ! संयमी, ज्ञानी, पूर्णकाम आणि नैष्ठिक ब्रह्मचारी अशा नारदांनी भगवान नारायणांनी केलेला उपदेश श्रद्धेने ग्रहण करून म्हटले.

## नारद उवाच

नमस्तस्मै भगवते, कृष्णायामलकीर्तये ।

यो धत्ते सर्वभूताना- मभवायोशतीः(ख्) कलाः ॥ 46॥

कृष्णा+ यामल+ कीर्तये, मभवा+ योशतीः(ख्)

नारद म्हणाले- भगवन ! परम पवित्र कीर्ती असणाऱ्या श्रीकृष्णांना नमस्कार असो. आपण सर्व प्राण्यांच्या मोक्षप्राप्तीसाठी रमणीय कलावतार धारण करता.

इत्याद्यमृषिमानम्य, तच्छिष्यां(म्)श्च महात्मनः ।

ततोऽगादाश्रमं(म्) साक्षात्, पितुर्द्वैपायनस्य मे ॥ 47॥

इत्याद् + यमृषिमा+ नम्य, तच्छिष् + यां(म्)श्च, ततोऽगा+ दाश्रमं(म्), पितुर् + द्वैपाय+ नस्य

नारदांनी अशा प्रकारे आदिऋषींना आणि त्यांच्या शिष्यांना नमस्कार करून माझे साक्षात पिता असलेल्या कृष्णद्वैपायनांच्या आश्रमाकडे ते गेले.

सभाजितो भगवता, कृतासनपरिग्रहः ।

तस्मै तद् वर्णयामास, नारायणमुखाच्छ्रुतम् ॥ 48॥

कृता+ सनपरिग्रहः, नारायण+ मुखाच् + छ्रुतम्

व्यासांनी त्यांचा यथोचित सत्कार केला. आसनावर बसल्यावर नारायणांच्या तोंडून जे काही ऐकले होते, ते सर्व नारदांनी त्यांना सांगितले.

इत्येतद् वर्णितं(म्) राजन्, यन्नः(फ्) प्रश्नः(ख्) कृतस्त्वया ।

यथा ब्रह्मण्यनिर्देश्ये, निर्गुणेऽपि मनश्चरेत् ॥ 49॥

कृतस् + त्वया, ब्रह्मण्य+ निर्देश्ये

राजन ! मन- वाणीच्या पलीकडे असणाऱ्या गुणरहित अशा परमात्म्यामध्ये मनाचा प्रवेश कसा होतो, हे तुझ्या प्रश्नाचे उत्तर मी तुला सांगितले.

योऽस्योत्प्रेक्षक आदिमध्यनिधने योऽव्यक्तजीवेश्वरो

यः(स्) सृष्ट्वेदमनुप्रविश्य ऋषिणा चक्रे पुरः(श्) शास्ति ताः ।

यं(म्) सं(म्)पद्य जहात्यजामनुशयी सुप्तः(ख्) कुलायं(यँ) यथा

तं(ङ्) कैवल्यनिरस्तयोनिमभयं(न्) ध्यायेदजस्रं(म्) हरिम् ॥ 50॥

योऽस्योत्+ प्रेक्षक, आदि+ मध्य+ निधने, योऽव्यक्त+ जीवेश्वरो

सृष्ट्वे+ दमनु+ प्रविश्य, जहात्+ यजा+ मनुशयी, कैवल्य+ निरस्तयो+ निमभयं(न्)

भगवानच या विश्वाचा संकल्प करतात. तसेच त्याच्या सुरुवातीला, मध्ये आणि शेवटी तेच असतात. प्रकृती आणि जीव या दोघांचे ते स्वामी आहेत. तेच ही सृष्टी निर्माण करून जीवाबरोबर हिच्यामध्ये प्रवेश करतात आणि शरीरांची निर्मिती करून तेच त्यांचे नियंत्रण करतात. गाढ झोपेत मनुष्य ज्याप्रमाणे शरीराचे अनुसंधान सोडतो, त्याचप्रमाणे ज्यांची प्राप्ती झाल्यावर मायेतून मुक्त होतो, अशा चिन्मात्र स्वरूपाने मायेचा निरास केलेल्या, संसारभय दूर करणाऱ्या श्रीहरींचे निरंतर चिंतन करीत राहावे.

**इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)**

**दशमस्कन्धे उत्तरार्धे नारदनारायण सं(वँ)वादे वेदस्तुतिर्नाम सप्ताशीतितमोऽध्यायः**

**ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते**

**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**

**ॐ शांतिः(श्) शांतिः(श्) शांतिः॥**

वह सच्चिदानंदघन परब्रह्म सभी प्रकार से सदा सर्वदा परिपूर्ण है। यह जगत भी उस परमात्मा से पूर्ण ही है, क्योंकि यह पूर्ण उस पूर्ण पुरुषोत्तम से ही उत्पन्न हुआ है। इस प्रकार परब्रह्म की पूर्णता से जगत पूर्ण होने पर भी वह परब्रह्म परिपूर्ण है। उस पूर्ण में से पूर्ण को निकाल देने पर भी वह पूर्ण ही शेष रहता है।